# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २६.०४.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**वाठोडा बिट मार्शलची सतर्कता :— घरफोडीचा प्रयत्न उधळला.**

दिनांक २५.०४.२०२६ चे १८.३० वा. पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत प्लॉट क्र. ३६, बिरसा नगर, दिघोरी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी सुमित धनंजय धंदरे वय २९ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलूप लावून परिवारासह नातेवाईकांचे लग्नसमारंभाकरीता उमरेड येथे गेले होते. दिनांक २६.०४.२०२६ चे पहाटे ०४.०० वा. ते ०४.३० वा. चे दरम्यान वाठोडा पोलीस स्टेशनचे बिट मार्शल पोशि शैलेंद्रकुमार व सागर भोयर हे रात्रगस्त करीत असतांना पंचिंग पॉईन्टजवळ एका व्यक्तीने त्यांना काही संशयीत इसम तोंडाला फडके बांधुन फिर्यादीचे बंद घरात घुसतांना दिसून आले अशी माहिती दिल्याने, त्यांनी सोबत असलेले बीट मार्शल यांना घेऊन घरास घेराव घालून दोन इसमांना फिर्यादीचे घरात चोरी करतांना पकडून ताब्यात घेतले. आरोपींची नावे विचारली असता त्यांनी आरोपी क्र. १) तपीष राहूल बागडे वय २४ वर्षे रा. हरीजन कॉलनी, जरीपटका, नागपूर व २) ऋषभ चंद्रशेखर कावळे वय २५ वर्षे रा. नझुल कॉलनी, जरीपटका, नागपूर असे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन फिर्यादीचे घरातून आलमारीचे कुलूप तोडून चोरी केलेला एकूण १७,०००/— रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे परि.मपोउपनि. प्रणाली बेनके यांनी आरोपीविरूध्द कलम ३३१(४),३०५,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदर कामगिरी मा. श्री निकेतन कदम, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ५, नागपूर शहर, श्री रोहीत ओव्हाळ, सहायक पोलीस आयुक्त, कळमणा विभाग, नागपूर शहर, व प्रभारी वपोनि संतोष सपाटे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि अमोल कोल्हे, परि. पोउपनि प्रणाली बेनके, सफौ. माधव, बीट मार्शल पोशि शैलेंद्रकुमार गौर, सागर भोयर, विष्णु ठवकर व जितेंद्र मनगटे यांनी केली आहे.



(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— उघडया दारातुन प्रवेश करून, चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, रॉयल एन्क्लेव्ह, गुरुदत्त कॉलनी, नरेंद्र नगर, नागपुर येथील फ्लॅट क्र. २०१ मध्ये राहणारे फिर्यादी संदीप विद्याधर शुक्ला वय ३७ वर्षे हे परिवारासह जेवण करुन शतपावली करण्याकरीता बाहेर गेले होते. घरी परत आल्यावर फ्लॅटचे दार बंद न करता परिवारासह घरात झोपलले असता, दिनांक २४.०४.२०२६ चे २३.५९ वा. ते दिनांक २५.०४.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे फ्लॅटचे उघडे दारातुन आंत प्रवेश करून, लोखंडी आलमारीतील रोख ४,००,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ६,६६,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. ऋषिकेश कडूस ९३२५३३५४५८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाडी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २४.०४.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, फिर्यादी योगेश बाबरावजी वडतकर वय ४८ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३१, आदिवासी ले आऊट, सुरक्षा नगर, वाडी, नागपूर हे त्यांचे मित्र संजय वय ५० वर्ष रा. दत्तवाडी, नागपूर यांचे सीबीझेड मोटरसायकलने पोलीस ठाणे वाडी हद्दीत, अमरावती रोड, दत्तवाडी, नाना पारधी पान सेंटर समोरुन जात असता, त्यांचे मागून येणारे ऑटोरिक्शा क्र. एमएच ४० बीएफ ५७९३ चे चालकाने त्याचे ताब्यातील ऑटोरिक्शा भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मित्राचे मोटारसायकलला मागुन धडक मारून, गंभीर दुखापत करून पळुन गेला. फिर्यादीचे मित्र किरकोळ व फिर्यादी हे गंभीर जखमी झाले. फिर्यादी यांना उपचाराकरीता लक्ष मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी उपचारादरम्यान दिलेल्या बयाणावरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. अमित बंडगर ८६००२८८२२८ यांनी आरोपी ऑटोरिक्शा चालकाविरूध्द कलम २८१, १२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यू)

**<u>१) पोलीस ठाणे सदर</u> :—** दिनांक ०६.०४.२०२६ रोजी, पोलीस ठाणे सदर हद्दीत एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, वार्ड क्र. ९ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक २६.०४.२६ चे ०५.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सदर येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि. आशिष जाधव ८०१०९५२०६४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे खापरखेडा</u> :—** दिनांक १४.०४.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा साळा नामे ईश्वर गोविंदराव वासनिक वय ४३ वर्ष रा. इसापुर, ता. सावनेर, जि. नागपूर हे त्यांचे मोटार सायकलने पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत दहेगाव चौक येथुन जात असता, त्यांचे समोर अचानक गाय आडवी आल्याने धडक लागून, अपघात झाल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचाराकरीता कुणाल हॉस्पीटल, येथे दाखल

करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक २६.०४.२०२६ चे ०७.०५ वा. सुमारास डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

यााप्रकरणी फिर्यादी राजेश शामराव मेश्राम वय ५० वर्ष रा. बारेगाव, पो. बीना, ता. कामठी, जि. नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोहवा मुकेश महालगावे ९३७०७४३३९० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/-**

**( मनोज राऊत )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**